## १४ . जाहिरात नंबर 1

काही महिन्यांपूर्वी दूरदर्शनवर एक जाहिरात दाखविली जाई . आपण शक्यतो एखादा कार्यक्रम जाहीरातीसाठी थांबला तर चॅनेल बदलतो . परंतु मी मात्र जाहिरातीसुद्धा बघतो व त्याचे विश्लेषण करतो . फार पूर्वी ॲडवरटायझिंग असोसिएशन ऑफ इंडिया चे हिशेबाचे काम करत असे त्याचा परिणाम असेल कदाचित . असो .

प्रथम ती जाहीरात सांगतो व मग त्याचे विश्लेषण करतो .

प्रसंग १) २ साहेब आपल्या आलीशान गाडीतून जात असतात . त्यांचा लॅपटॉप चालू होत नसतो . गाडी एक देखणा तरूण चालवत असतो .

प्रसंग २) वाहनचालकाच्या लक्षात येते की साहेबांचा लॅपटॉप चालत नाहीये . तो साहेबाला विनंती करतो कि मी काही मदत करू शकतो का ? साहेबाला आश्च्र्यर्य वाटते व साहेब त्याला लॅपटॉप हाताळायची परवानगी देतो .

प्रसंग ३) तो वाहनचालक लॅपटॉप चालू करतो . साहेब खुष होतात . साहेब त्याला कचेरीत भेटायला सांगतात .

प्रसंग ४) साहेब वाहनचालकाला नोकरी देतो .

प्रसंग ५) तो तरूण घरी येतो . त्याचे भाऊ त्याला खांद्यावर उचलतात .

प्रसंग ६) त्याच वेळी ज्या मालाची जाहीरात असते ते प्रॉडक्ट म्हणजेच **No.** १ **(**दारू**)** ची बाटली दूरदर्शनवर दाखविली जाते व जाहिरात संपते .

मला मात्र ह्या जाहिरातीपासून तरूणांनी बोध घ्यावा असे वाटले . घाबरू नका त्यांनी दारू प्यावी अशी माझी अजिबात इच्छा नाही .
ही जाहिरात विरंगुळा म्हणून ट्रेनिंग देताना मी विद्यार्थांना सांगतो व त्यांची मते विचारतो . बरेच वेळा फारशी वेगळी मते सांगितली जात नाहीत . पण जेव्हा मी भाष्य करतो तेव्हा अर्थातच सगळेजण माझ्या मताशी सहमत होतात .

मग काय ? सांगू का माझी मते ? मला जे वाटले ते ?

१. ही जाहिरात आजच्या परिस्थितीवर थोडेफार भाष्य करते. आज शिक्षण घेतल्यानंतर नोकरीचा भरवसा नसतो.

२. तो तरूण खचीतच शिकलेला होता. ( आयटी क्षेत्रात )

३. असे असतानासुद्धा गरज म्हणून त्याला वाहनचालका ची नोकरी करण्यास कमीपणा वाटत नव्हता.

४. लॅपटॉप चालू होत नाही असे कळल्यानंतर वाहनचालकाने विचारणा केल्यानंतर साहेब त्याला लॅपटॉप देतात. त्याच्यावर विश्वास दाखवितात. कोणताही न शिकलेला वाहनचालक असे करणारच नाही. त्यामुळे ह्या (शिकलेल्या) वाहनचालकाने विचारल्यानंतर त्याचा अपमान न करता (तू काय करणार ? तू तर वाहनचालक) असे न म्हणता त्याच्यावर विश्वास दाखवितात. ही वागणुक साहेब लोकांनी लक्षात घेण्यासारखी आहे.

५. नोकरी लागल्यानंतर मजेसाठी ह्या पॉडक्ट चा पुरस्कार केला जातो. अर्थात हे मला पटले नाही. जेव्हा माणसाला कष्टसाध्य यश मिळते तेव्हा त्याची नशा ही कोणत्याही दारूने चढणार नाही एवढी असते.

६. घरी गेल्यानंतर त्याला खांद्यावर उचलून घेतले जाते. कदाचित ते त्याचे लहान भाऊ असतील. पण ३-४? हल्लींच्या महागाईच्या जगात एवढे मोठे कुटुंब ?

७. त्या तरूणाचे वडिल वाहनचालक असणार. हल्ली वाहनचालकाला नोकरी लगेच मिळू शकते.

८. जर का त्याचे वडिल वाहनचालक असतील व त्यांचे एवढे मोठे कुटूंब असेल तर त्यांनी नक्कीच जीवाचे रान करून मुलाला शिकवले असणार. मुलगा लॅपटॉप चालू करतो म्हणजे त्याने ब-यापैकी आयटी क्षेत्रात शिक्षण घेतले असणार.

९. कोणतेही काम कमीपणाचे न वाटता ( प्रामाणिकपणे येणा-या परिस्थितीचा विचार करून ) करायची तयारी असणे आवश्यक आहे. कोणतेही काम लहान / मोठे नसते. प्रत्येक काम महत्वाचे असते. जर का वाहनचालकाने अपघात केला तर साहेबांच्या हुशारीचा उपयोग होईल का ? साहेबांचे काम व वाहनचालकाचे काम चांगल्या प्रकारचेच झाले पाहिजे. शिक्षण वेगळया प्रकारचे एवढाच त्याचा अर्थ. दोघांचीही सारखीच गरज.
तुमची काही मते ?